माळीबुवा जॉर्ज, जातात शहरात!



कल्पना आणि चित्रे: सुझन मॉक्सली, मराठी: स्वाती कुलकर्णी

माळीबुवा जॉर्ज, जातात शहरात!



कल्पना आणि चित्रे: सुझन मॉक्सली, मराठी: स्वाती कुलकर्णी

निळ्या निळ्या पर्वतरांगांच्या कुशीत

खूप दूरवर एका खेड्यामध्ये,

जॉर्ज नावाचा एक माळी रहात असे.

तिथे तो जादुई फुले उगवत असे.



 

त्याला हिरवीगार बोटे आणि अंगठ्याची देणगी होती,
त्याने पेरलेले प्रत्येक बी छान वाढत आणि फोफावत असे,
त्याच्या बगीच्यातील प्रत्येक झाड आणि प्राणी
इंद्रधनुष्याप्रमाणे चमकदार आणि तेजस्वी होते.
अशा या माळीबाबाच्या सर्व गरजा गाव पुरवत असे.







आपला हा माळी जॉर्ज मात्र

शहरात जाण्याची स्वप्नं बघत होता.

एके दिवशी सकाळी तो उठला,

आणि त्याने आपल्याकडे असणारे सर्वोत्तम कपडे घातले,

पिशवीत काठोकाठ फळं भरून घेतली,

खिसा बी-बियाणांनी गच्च भरून घेतला

आणि तो शहरात गेला.







पण हे काय?

शहरातले रस्ते तर रिकामे आणि कंटाळवाणे होते!

एकही झाड किंवा पक्षी त्याच्या नजरेस पडले नाही.



माळीबुवांच्या नजरेस तेवढीच फुले पडली
जी दुकानांच्या खिडकीत सजवून ठेवली होती,
जी अगदी दुःखी आणि दुर्लक्षित दिसत होती.







बिच्चारा जॉर्ज!

इथे माळ्याची गरजच नव्हती कुणाला!

फुलांच्या ऐवजी इथे नुसताच कचरा होता.

मग आपल्या माळीबाबाला इथे काम
मिळाले रस्ते झाडण्याचे.





त्या रात्री, एका मोकळ्या आवारात जॉर्ज विसावला.

जेवणासाठी म्हणून गावाहून आणलेली संत्री पिशवीतून काढली,

त्यावेळी रुमालात बांधून आणलेल्या बिया त्याच्या हाताला लागल्या,

आणि त्याला एक मस्त कल्पना सुचली!

"चला, इथेच एक छान बाग बनवून टाकावी!!"







दुसऱ्या दिवशी त्याने रात्री खाल्लेल्या
संत्र्याच्या साठवलेल्या बिया
आणि गावाहून आणलेल्या बिया,
सर्व जमिनीत पेरल्या.



हळू हळू बियांना सुंदर अंकुर फुटले.
जादुई झाडे वाढू लागली.
इंद्रधनुष्याइतकी तेजस्वी फुलपाखरे
व पक्षी तिथे दिसू लागले.













हे अद्भुत दृश्य पाहण्यासाठी लोक मुद्दाम थांबू लागले,
एकमेकांना दाखवत, बागेकडे टकमक पाहू लागले.





आणि मग जॉर्जला आत्तापर्यंतची सर्वोत्तम कल्पना सुचली!

"मी बागेत एका मेजवानीचे आयोजन करेन" तो उद्गारला,

"आणि शहरातील प्रत्येकाला आमंत्रण देईन."





सर्वत्र शिलाईयंत्रांचे गुंजन सुरु झाले.

बेकरीतून अद्भुत सुगंध दरवळू लागला.

संगीतकारांनी आपली वाद्ये सुरात लावून घेतली.

आणि माळीबाबा जॉर्ज यांच्या मेजवानीसाठी आपण सगळ्यात सुंदर दिसू

ह्याची प्रत्येकाने काळजी घेतली.











अखेर तो दिवस, आणि ती वेळ आली.

माळीबाबांनी प्रवेशद्वार उघडले आणि.....



पूर्वी कधी झाली नाही

अशी ती मेजवानी ठरली.





अरे, पण हे काय!

मेजवानी जोशात चालू असताना, मध्येच,

जॉर्ज माळ्याने आपली रिकामी बॅग घेतली

आणि तो तिथून निसटला, मिशीतल्या मिशीत मिश्कीलपणे हसत.

तो परत निघाला होता निळ्याशार डोंगराखाली दूर दूर असलेल्या आपल्या गावातल्या घरी!

मात्र, जाताना तो एक खास भेट मागे ठेवून गेला होता,

त्या दिवशी आलेल्या प्रत्येक पाहुण्यासाठी







आणि शहरासाठी सुद्‌धा!

